# कृपया प्रसिद्धीसाठी

**दिव्यांग क्रिकेट विश्वविजेता भारतीय संघाच्या उपस्थीतीत 20 व्या पार्ले महोत्सव चे भव्य उद्घाटन**

मुंबई दि. 22 : मुंबईतील सर्वात मोठा व लोकप्रिय ठरलेल्या 20 व्या पार्ले महोत्सवाचा भव्य उद्घाटन सोहळा दिव्यांग क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतील विश्वविजेत्या भारतीय संघाचा कर्णधार विक्रांत केणी यांच्या हस्ते संपन्न झाला.सुमारे 2000 स्पर्धक,पालक व पार्लेकर नागरिकांच्या उपस्थिती तर 100 ढोल वादकांच्या गजरात विक्रांत केणी यांनी मशाल प्रजवलीत करत महोत्सवाचे उद्घाटन केले.या प्रसंगी प्रमुख आयोजक आमदार पराग अळवणी, संघाचे प्रशिक्षक सुलक्षण केणी,संचालक विनोद देशपांडे,खेळाडू रवींद्र सांटे, कुणाल फणसे हे सुद्धा उपस्थित होते.

पार्ले महोत्सव हे प्रत्येका मधील सुप्त कला गुणांना विकसित करणारे व्यासपीठ असून स्पर्धांच्या निमित्ताने या कला गुणांचा शोध ही लागतो व ते विकसित सुद्धा होतात.आपल्यामधील शारीरिक दिव्यंगत्वावर मात करून विश्वचषक पटकावणाऱ्या संघाच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पाडणे हे पार्ले महोत्सवाचे भाग्य असून यातून स्पर्धकांना आपल्या मधील गुण जिद्दीने विकसित करण्यासाठी भरपूर प्रेरणा मिळेल असे उद्गार आमदार पराग अळवणी यांनी काढले.

विश्वचषकातिल अन्य देशाचे खेळाडुंमध्ये केवळ 15% तर भारतीय निकषानुसार आपल्या खेळाडूंमध्ये 40% दिव्यंगत्व असताना सुद्धा आपल्या खेळाडूंनी विश्वचषक झिंकणे हे विशेष होते असे प्रशिक्ष सुलक्षण कुलकर्णी यांनी सांगितले." कोणीही आपल्यामधील शारीरिक दिव्यंगत्व किंवा अन्य उणिवा बाबत सहानुभूतीची अपेक्षा करू नये तर त्यावर जिद्दीने मात करत आपल्यावरील जबाबदारी यशस्वीपणे पार पाडायची असते" ही महत्वपूर्ण शिकवण मला या संघाचे प्रशिक्षक म्हणून मिळाली असेहि त्यांनी सांगितले.

यंदाच्या वर्षी महोत्सवातील क्रीडा स्पर्धा संपन्न होणाऱ्या वामन मंगेश दूभाषी मैदान परिसरास स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर क्रीडा नगरी असे तर कला व सांस्कृतिक स्पर्धा संपन्न होणाऱ्या साठ्ये महाविद्यालय परिसरास प्रा.मोहनराव आपटे कला दालन असे नाव देण्यात आले आहे.

याप्रसंगी, केशवसृष्टीच्या अध्यक्षा डॉ अलका मांडके यांनी स्व डॉ नितु मांडके मधील असलेल्या एका खेळाडूच्या आठवणी सांगत दरवर्षी प्रमाणे सर्व पारितोषिके डॉ नितु मांडके यांच्या समरणार्थ पुरस्कृत करण्याचे घोषित केले.तर पहिल्या वर्षी पासून पार्ले महोत्सवाच्या आयोजनात सहयोगी असलेल्या पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या साठ्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ माधव राजवाडे यांनी सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी धावणे व सायकलिंग स्पर्धांमधून सुमारे 2000 स्पर्धकांनी भाग घेतला तर दुसऱ्या दिवशी (रविवारी) सकाळपासून 15 वय गटात झालेल्या मराठी व हिंदी गायन व कराओके स्पर्धेतून 500 स्पर्धक तर सकाळपासून सुरू झालेल्या शालेय व खुल्या कबड्डी स्पर्धेतुन सुमारे 1000 स्पर्धक तर विले पार्ल्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यां साठीच्या व्हॉली बॉल स्पर्धेतून सुमारे 300 असे एकूण 3800 स्पर्धक पहिल्या दोन दिवसात सहभागी होणार आहेत अशी माहिती प्रमुख आयोजक पराग अळवणी यांनी दिली.

या प्रसंगी पार्ल्यातील सुप्रसिध्द जवाहर बुक स्टोअरचे मालक दिलीप भोगले,नगरसेविका ज्योती अळवणी व सुनीता मेहता,नगरसेवक अभिजित सामंत व अनिष मकवानी,डिजिटल पार्टने स्पिर्ट्स नशाचे राजेश देव व आजू देशपांडे,आयोजन समितीचे विनीत गोरे, श्रीकृष्ण आंबेकर,प्रवीर कपूर,चरणजीत सिंग संधू, मिलिंद शिंदे,कौंतेय देशपांडे,राजेश मेहता,एन सुरेशन,बिमल भुता,रिद्धी धुरी,चित्रेश मुलाजी,सचिन कोंडे,संजय वाकोडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.